CUET UG 2026 Marathi May 19 Shift 1 Question Paper

Conducted by the National Testing Agency (NTA)

Time Allowed: 60 Minutes **Total Questions: 50** **Maximum Marks: 250**

General Instructions

(i) This is the **Marathi** question paper of **CUET (UG) 2026**, conducted by the **National Testing Agency (NTA)** in Computer Based Test (CBT) mode.

(ii) The paper contains **50 multiple choice questions**. All questions are compulsory.

(iii) The duration of this test paper is **60 minutes**. The maximum score is **250 marks**.

(iv) Each question has **four options**. Select the **one correct answer** for each question.

(v) **Marking scheme: +5 marks** for a correct answer, **-1 mark** for an incorrect answer, and **0 marks** for an unanswered question.

(vi) For questions based on a passage or table, read the given material carefully and answer the questions that follow.

1. जोड्या जुळवा: सर्वनाम आणि प्रकार

स्तंभ - I	स्तंभ - II
(सर्वनाम)	(सर्वनाम प्रकार)
A. प्रश्नार्थक सर्वनाम	I. कोण
B. आत्मवाचक सर्वनाम	II. तो
C. दर्शक सर्वनाम	III. स्वत:
D. संबंधी सर्वनाम	IV. जो

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-III, B-II, C-I, D-IV (B) A-I, B-III, C-II, D-IV

(C) A-IV, B-II, C-I, D-III (D) A-III, B-I, C-II, D-IV

2. जोड्या जुळवा: म्हणी व त्यांचे अर्थ

स्तंभ – I (म्हणी)	स्तंभ - II (अर्थ)
A. नाकापेक्षा मोती जड	I. एका झटक्यात वादग्रस्त गोष्टीचा निकाल
B. हजीर तो वजीर	II. ज्याचा काहीच उपयोग नाही असा माणूस
C. खायला काळ भुईला भार	III. कनिष्ठ दर्जाचा माणूस वरिष्ठाहून वरचढ होणे
D. एक घाव दोन तुकडे	IV. वेळेवर हजर असणाऱ्याला लाभ होतो

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-III, B-II, C-IV, D-I (B) A-III, B-IV, C-II, D-I

(C) A-IV, B-II, C-III, D-I (D) A-II, B-I, C-IV, D-III

3. जोड्या जुळवा: वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

स्तंभ - I	स्तंभ - II
(वाक्प्रचार)	(अर्थ)
A. अंगावर मूठभर मांस चढणे	I. नियंत्रण घालणे
B. आळा घालणे	II. धन्यता वाढणे
C. कान देणे	III. व्यवस्था करणे
D. तजवीज करणे	IV. लक्षपूर्वक ऐकणे

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-I, B-II, C-III, D-IV (B) A-II, B-I, C-IV, D-III

(C) A-IV, B-II, C-III, D-I (D) A-II, B-III, C-IV, D-I

4. जोड्या जुळवा: काळ – प्रकार

स्तंभ – I (विधान)	स्तंभ - II (काळ)
A. रमेशने चित्र पूर्ण केले आहे.	I. अपूर्ण भूतकाळ
B. आई स्वयंपाक करत होती.	II. पूर्ण वर्तमानकाळ
C. सुजाताने पेरू खाल्ला असेल.	III. अपूर्ण वर्तमानकाळ
D. राम अभ्यास करत आहे.	IV. पूर्ण भविष्यकाळ

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-III, B-II, C-IV, D-I (B) A-IV, B-I, C-II, D-III

(C) A-I, B-II, C-III, D-IV (D) A-II, B-I, C-IV, D-III

5. जोड्या जुळवा: नाम आणि प्रकार

स्तंभ – I (नाम)	स्तंभ - II (प्रकार)
A. धैर्य	I. सामान्य नाम
B. घर	II. भाववाचक नाम
C. हिमालय	III. समुदायवाचक नाम
D. कळप	IV. विशेष नाम

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-III, B-IV, C-I, D-II (B) A-IV, B-III, C-II, D-I

(C) A-IV, B-I, C-II, D-III (D) A-II, B-I, C-IV, D-III

6. जोड्या जुळवा: शब्दसमूहासाठी योग्य शब्द

स्तंभ – I (शब्द)	**स्तंभ - II (शब्दसमूह)**
A. गर्भश्रीमंत	I. तुलना करता न येणारा
B. अग्रज	II. आधी जन्मलेला
C. अतुलनीय	III. जन्मापासून मुबलक संपत्ती असणारा
D. अविनाशी	IV. कधीही नाश न पावणारा

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-III, B-II, C-I, D-IV (B) A-III, B-I, C-II, D-IV

(C) A-II, B-III, C-IV, D-I (D) A-IV, B-III, C-II, D-I

7. जोड्या जुळवा: टोपणनाव - मूळ नाव

स्तंभ - I	**स्तंभ - II**
(मूळ नाव)	**(टोपणनाव)**
A. गोपाळ हरी देशमुख	I. चारुता सागर
B. त्र्यंबक बापूजी ठोंबरे	II. लोकहितवादी
C. दिनकर दत्तात्रय भोसले	III. बालकवी
D. विष्णू वामन शिरवाडकर	IV. कुसुमाग्रज

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-II, B-III, C-I, D-IV (B) A-IV, B-III, C-II, D-I

(C) A-III, B-II, C-I, D-IV (D) A-I, B-III, C-IV, D-II

8. जोड्या जुळवा: वर्णाचे प्रकार व वर्ण

स्तंभ- I	**स्तंभ - II**
(वर्णाचे प्रकार)	**(वर्ण)**
A. ह्रस्व स्वर	I. श्, ष्, स्
B. उष्मे	II. अ, इ, उ, ऋ, ऌ
C. स्वरादी	III. अं, अः
D. अनुनासिक	IV. ङ्, ण्, न्, म्

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-I, B-II, C-III, D-IV (B) A-II, B-I, C-III, D-IV

(C) A-IV, B-III, C-II, D-I (D) A-II, B-IV, C-III, D-I

9. जोड्या जुळवा: प्रसिद्ध लेखक/कवी - कलाकृती

स्तंभ- I	**स्तंभ - II**
(कलाकृती)	**(लेखक/ कवी)**
A. अमृतानुभव	I. वि. स. खांडेकर
B. ययाती	II. वि. वा. शिरवाडकर
C. गीतारामायण	III. संत ज्ञानेश्वर
D. नटसम्राट	IV. ग. दि. माडगुळकर

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-II, B-III, C-I, D-IV (B) A-IV, B-I, C-II, D-III

(C) A-III, B-II, C-IV, D-I (D) A-III, B-I, C-IV, D-II

10. जोड्या जुळवा: ध्वनिदर्शक शब्द

स्तंभ – I	**स्तंभ - II**
A. म्हशीचे	I. रेकणे
B. घंटेचा	II. गर्जना
C. सिंहाची	III. घणघणाट
D. मोराचा	IV. केकारव

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) A-III, B-II, C-IV, D-I (B) A-I, B-III, C-II, D-IV

(C) A-III, B-I, C-IV, D-II (D) A-II, B-III, C-I, D-IV

11. संधी करा: गण+ ईश

(A) गणेश (B) गणीश

(C) गुणेश (D) गणैश

12. बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दर्शवण्यासाठी _____ वापरतात.

(A) अर्धविराम (B) दुहेरी अवतरण चिन्ह

(C) अधोरेखा (D) लोपचिन्ह

13. पुढील शब्दासाठी दिलेल्या पर्यायांमधून योग्य समूहवाचक शब्द ओळखा: भाजीची =

(A) पेंड (B) जुडी

(C) चळत (D) रास

14. पुढीलपैकी देशी/ देशज शब्द ओळखा.

(A) दगड (B) जल

(C) शर्ट (D) ग्रंथ

15. जोडीने येणाऱ्या शब्दांची चुकीची जोडी ओळखा.

(A) लाकूड - फाटा (B) हवा - पाणी

(C) बाजार - गर्दी (D) सनई - चौघडा

16. खालील वाक्य कोणत्या अलंकाराचे उदाहरण आहे ते ओळखा.
आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे!

(A) उपमा अलंकार (B) रूपक अलंकार

(C) उत्प्रेक्षा अलंकार (D) अपन्हुती अलंकार

17. पुढीलपैकी लेखननियमांनुसार प्रमाण शब्द ओळखा.

(A) आशिर्वाद (B) आर्शीवाद

(C) आशीर्वाद (D) अशिर्वाद

18. 'दहा मुली', 'अर्धा तास' या उदाहरणांतील विशेषणाचा प्रकार ओळखा.

(A) गुणविशेषण (B) सार्वनामिक विशेषण

(C) अनिश्चित संख्याविशेषण (D) गणनवाचक संख्याविशेषण

19. समास ओळखा: चहापाणी

(A) समाहार द्वंद्व समास (B) तत्पुरुष समास

(C) बहुव्रीही समास (D) अव्ययीभाव समास

20. पुढीलपैकी कर्मणी प्रयोगाचे वाक्य ओळखा.

(A) रामाने रावणास मारले. (B) शिक्षक मुलांना शिकवतात.

(C) आज सतत गडगडले. (D) मुलाने चिंच खाल्ली.

21. पुढील पर्यायांचा योग्य अनुक्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.
(A) आज माहिती
(B) माहितीचा विस्फोट
(C) तंत्रज्ञानाच्या जगात
(D) झाला आहे
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (A), (B), (C), (D) (B) (A), (C), (B), (D)

(C) (B), (A), (D), (C) (D) (C), (B), (D), (A)

22. पुढील पर्यायांचा योग्य अनुक्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.
(A) मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो
(B) कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस
(C) वि. वा. शिरवाडकर अर्थात
(D) २७ फेब्रुवारी हा ज्येष्ठ साहित्यिक
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (C), (B), (D), (A) (B) (A), (C), (B), (D)

(C) (D), (C), (B), (A) (D) (B), (C), (D), (A)

23. पुढील वाक्याचा अचूक क्रम ओळखा.
(A) वाहनाचा वेग
(B) झाला तर
(C) अनिवार
(D) चित्ताची व्यग्रता वाढते
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (A), (B), (C), (D) (B) (A), (C), (B), (D)

(C) (B), (A), (D), (C) (D) (C), (B), (D), (A)

24. पुढील मजकुराचा योग्य क्रम ओळखा.
(A) परी अमृतातेंही पैजा जिंके ।
(B) ऐसी अक्षरें रसिके ।
(C) माझा मऱ्हाटाचि बोलू कवतिके ।
(D) मेळवीन ।
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (A), (B), (C), (D)
(B) (C), (A), (B), (D)
(C) (B), (A), (D), (C)
(D) (C), (B), (D), (A)

25. अर्थपूर्ण विधान बनवण्यासाठी पुढील मजकूर योग्य क्रमाने लावा.
(A) दुसऱ्या महायुद्धाची
(B) इतिश्री झाली
(C) आणि अमेरिका एक
(D) महाशक्ती म्हणून उदयास आला
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (A), (B), (C), (D)
(B) (A), (C), (B), (D)
(C) (B), (A), (D), (C)
(D) (C), (B), (D), (A)

26. अर्थपूर्ण विधान तयार करण्यासाठी पुढील पर्यायांचा योग्य क्रम लावा.
(A) शब्दांना धातुसाधिते किंवा
(B) धातूला विविध प्रत्यय लागून बनणाऱ्या
(C) व अपुरी क्रिया दाखविणाऱ्या
(D) कृदन्ते असे म्हणतात
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (A), (B), (C), (D)
(B) (A), (C), (B), (D)
(C) (B), (C), (A), (D)
(D) (C), (B), (D), (A)

27. पुढील पर्यायांचा योग्य अनुक्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.
(A) पर्यावरण प्रदूषण, कचऱ्याची समस्या
(B) व स्वच्छता हा आपल्या देशाला
(C) भेडसावणारा खूप मोठा प्रश्न आहे
(D) वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारे
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (C), (B), (D), (A)
(B) (D), (A), (B), (C)
(C) (C), (D), (A), (B)
(D) (B), (C), (D), (A)

28. पुढील पर्यायांचा योग्य अनुक्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.
(A) करुणरसाची निर्मिती होते
(B) मनातील वैयक्तिक दुःखाची
(C) अनुभवाला आली तर तिथे
(D) भावना जर साहित्यातून
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (C), (D), (B), (A)
(B) (D), (C), (B), (A)
(C) (A), (D), (C), (B)
(D) (B), (D), (C), (A)

29. पुढील पर्यायांचा योग्य अनुक्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.
(A) नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरूपात
(B) वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी
(C) त्याला व्याकरणात विभक्ती असे म्हणतात
(D) जो बदल किंवा विकार होतो
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (C), (A), (D), (B)
(B) (B), (C), (A), (D)
(C) (B), (D), (A), (C)
(D) (B), (A), (D), (C)

30. पुढील पर्यायांचा योग्य अनुक्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.
(A) प्रारंभीच्या काळातील
(B) प्रसिद्ध ग्रंथकार होते
(C) लिहिणारे म्हाइंभट मराठीतील
(D) 'लीळाचरित्र' हा आद्य गद्यग्रंथ
पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) (B), (A), (C), (D)
(B) (A), (B), (C), (D)
(C) (C), (D), (B), (A)
(D) (D), (C), (A), (B)

31. पुढील शब्दासाठी योग्य समानार्थी पर्याय ओळखा: फडतूस

(A) टाकाऊ (B) सुरेख

(C) लबाड (D) बक्षीस

32. पुढील शब्दासाठी योग्य समानार्थी नसलेला पर्याय ओळखा: माकड

(A) वानर (B) कपि

(C) मर्कट (D) मनुज

33. 'असंख्य', 'पुष्कळ', 'अतोनात' हे पुढीलपैकी कोणत्या शब्दाचे समानार्थी शब्द आहेत?

(A) अमाप (B) अमर

(C) मंगल (D) अल्प

34. 'चंचल' या शब्दासाठी योग्य समानार्थी शब्द कोणता आहे?

(A) विचलीत (B) हळवा

(C) प्रेमळ (D) स्तब्ध

35. पुढीलपैकी कोणता शब्द 'आनंदी' या शब्दाचा समानार्थी नाही?

(A) खूश

(B) उल्हासी

(C) प्रसन्न

(D) खिन्न

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) केवळ C आणि D (B) केवळ B आणि D

(C) केवळ A (D) केवळ D

36. पुढील शब्दासाठी योग्य विरुद्धार्थी पर्याय ओळखा. आळशी

(A) खुजा (B) उद्योगी

(C) मूर्ख (D) आश्रित

37. पुढील शब्दासाठी योग्य विरुद्धार्थी पर्याय ओळखा. अनिवार्य

(A) अनासक्त (B) ऐच्छिक

(C) अननुभूती (D) स्वैर

38. 'मुभा', 'मोकळीक' हे पुढीलपैकी कोणत्या शब्दाचे विरुद्धार्थी शब्द आहेत?

(A) अटकाव (B) विजोड

(C) अचल (D) वेंधळा

39. 'अबोल' हा पुढीलपैकी कोणत्या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द आहे?

(A) चाणाक्ष (B) वाचाळ

(C) निर्लोभी (D) निर्मळ

40. पुढीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची अचूक जोडी ओळखा.

(A) क्षमता X अक्षमता

(B) हट्टी X समंजस

(C) स्वास्थ X आरोग्य

(D) सुबोध X सुलभ

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा.

(A) केवळ A आणि B (B) केवळ A आणि C

(C) केवळ C आणि D (D) केवळ A

Read the passage and answer Questions 41-45.

हॉलंडमधील खार जमिनीचा विकास

हॉलंड हा युरोप खंडातील एक अत्यंत पुढारलेला देश समजला जातो. या देशाने उद्योगधंदे, व्यापार व शेती याबाबतीत गेल्या काही वर्षात फार मोठी प्रगती केली आहे. हॉलंडमधील रोटरडॅम हे बंदर तर युरोपचे प्रवेशद्वार समजले जाते. आकाराने हा देश फार लहान आहे. परंतु या देशातील लोक अत्यंत उद्योगी व कल्पक आहेत. खार जमिनीचा जास्तीत जास्त उपयोग कसा करावा हे पाहावयाचे असेल तर हॉलंड देशाचेच उदाहरण पुढे ठेवावे लागेल.

हॉलंडमधील बरीचशी जमीन ही समुद्र सपाटीच्या खाली आहे. गेली कित्येक शतके हॉलंड देशाला समुद्राच्या वाढत्या आक्रमणाशी झुंज द्यावी लागत आहे. मोठमोठ्या पाणथळ व खार जमिनींनी सर्व देश व्यापलेला आहे. देशाची वाढती लोकसंख्या, उद्योगधंदे व रस्ते यांना लागणारी जमीन अपुरी पडू लागली. त्यामुळे डच सरकारने 'झुय्र सी' नावाची खार जमिनीच्या विकासाची एक मोठी योजना तयार केली. त्याकरिता २० मैल लांबीचा एक प्रचंड बांध समुद्रात बांधला. या बांधामुळे समुद्रातील मोठ्या खाड्यांनी व्यापलेली सुमारे ५ लक्ष एकर जमीन शेती व औद्योगिक वसाहतीसाठी उपलब्ध झाली आहे. या बांधाची मूळ कल्पना व योजना डॉ. लेली नावाच्या इंजीनियरने तयार केली. या प्रचंड बांधाला लागणाऱ्या दगडाचा येथे तुटवडा होता. त्यामुळे हे दगड त्यांनी बेल्जियम व जर्मनीमधून आयात केले.

या बांधामुळे आतल्या बाजूला सुमारे ३ लक्ष एकराचे प्रचंड सरोवर निर्माण झाले आहे. या सरोवरात जर्मनीमधून वाहत येणारी ऱ्हाईन नदी येऊन मिळेल अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळे या सरोवरास 'ऱ्हाईन सरोवर' असे म्हणतात. हा बांध तयार झाल्यावर काही वर्षातच जेथे समुद्र होता तेथे आज गोड्या पाण्याचे प्रचंड सरोवर तयार झाले आहे. या सरोवरात मोठमोठ्या बोटींची वाहतूक चालते. शिवाय मासेमारीचाही मोठा उद्योग चालतो. अवर्षणाच्या वेळी आजूबाजूच्या शेतीलाही या पाण्याचा सिंचनासाठी उपयोग केला जातो.

41. डच सरकारने खार जमिनीच्या विकासासाठी तयार केलेली योजना कोणती?

(A) शेतीपूरक योजना
(B) व्यवसायपूरक योजना
(C) 'झुत्र सी' योजना
(D) 'सी - लेक' योजना

42. समुद्रात बांधलेल्या बांधाची मूळ कल्पना व योजना _____ यांची होती.

(A) डॉ. लेली
(B) डॉ. केल्विन
(C) डॉ. आर्थर
(D) डॉ. लुकास

43. हॉलंडमधील समुद्रात बांधण्यात आलेल्या बांधासाठी लागणारे दगड कोणत्या देशातून आयात करण्यात आले?

(A) बेल्जियम आणि रशिया
(B) जर्मनी व इंग्लंड
(C) बेल्जियम व जर्मनी
(D) रशिया व जर्मनी

44. समुद्रात बांधलेल्या बांधामुळे बांधाच्या आतल्या बाजूने किती एकर क्षेत्रफळाचे सरोवर तयार झाले?

(A) १ लक्ष एकर
(B) ३ लक्ष एकर
(C) ४ लक्ष एकर
(D) ५ लक्ष एकर

45. हॉलंड देशातील लोक _____ आहेत.

(A) आळशी व निरोद्योगी
(B) अत्यंत उद्योगी व कल्पक
(C) धूर्त व चलाख
(D) साधी व निरक्षर

Read the passage and answer Questions 46-50.

प्रायश्चित्त

शेवटची ओळ वाचून मंगेशांनी पुस्तक बंद केलं. डोकं खुर्चीच्या मागे टेकवलं आणि डोळे मिटून घेतले. थकवा जाणवत होता फार. पाच मिनिटं तसेच बसून राहिले ते. मग खुर्चीतल्या खुर्चीत ताठ होत डोळे उघडले. हातातलं पुस्तक टेबलावर ठेवलं आणि आपलं चाळीस वर्षांपूर्वीचं मनगटी घड्याळ हातात घेवून त्यांनी वेळ पाहिली. पाच वाजून सतरा मिनिटं झाली होती. चहाची वेळ उलटून गेली होती. वाचनाच्या नादात कळलंच नव्हतं. भारती असती तर बरोबर साडेचारला आत येवून वाफाळता चहा समोर ठेवला असता. प्रत्येक गोष्टीच्या वेळा अगदी ठरलेल्या होत्या आपल्या. अगदी सकाळच्या चहापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत. कधीच चुकल्या नाहीत त्या एवढ्या वर्षांत!

आज फार वेळ झाला. कादंबरी संपवायच्या नादात भान नाही राहिलं वेळेचं. डॉक्टरांनी सांगितलं आहे, जास्त ताण देऊ नका मेंदूला म्हणून. तरी हट्टानं वाचत राहतो आपण. मग थकवा येतो प्रचंड. विश्रांती घ्यायची म्हटले तरी जमत नाही. शरीराला सवय नाही तशी आणि मनाला तर नाहीच नाही. पलंगावर नुसतं पडून वेळही जात नाही. वाचत राहिलो तर वेळ सरतो तरी पुढे. कठीण आहे यापुढे आपल्यासारख्या एकएकट्या माणसांचं. एक दिवस संपतो आयुष्यातला तेव्हा सुटकेचा निःश्वास टाकतो आपण. दिवस जातो कसातरी, पण संध्याकाळ अगदी खायला उठते. जोडीदाराशिवायचं आयुष्य इतकं भयाण होवून जातं हे ठावूक नव्हतं तेव्हा. ती असताना किंमत नाही कळली तिची. आता जाणवतं सारखं. चहाची तलफ आली तरी उठवंसं नव्हतं वाटत मंगेशांना. आताही कुठून तरी ती येईल आणि ठेवेल हातात चहाचा कप असं उगीचच वाटलं क्षणभर; मग उठले ते हट्टानं.

46. वरील कथेच्या उताऱ्यात कोणत्या प्रकारचे दुःख चितारण्यात आले आहे?

(A) मुलाच्या वियोगाचे (B) जोडीदाराच्या वियोगाचे

(C) वाचनाचे (D) चहाच्या व्यसनाचे

47. घड्याळ किती वर्षांपूर्वीचे आहे?

(A) तीस (B) तीन

(C) चाळीस (D) पन्नास

48. 'खायला उठणे' - या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ काय?

(A) आनंद वाटणे (B) खूप भूक लागणे

(C) असह्य होणे (D) गोंधळून जाणे

49. मेंदूला जास्त ताण देऊ नका म्हणून कोणी सांगितले आहे?

(A) डॉक्टरांनी (B) भारतीने

(C) मंगेशांनी (D) जोडीदाराने

50. कशाची वेळ उलटून गेली होती?

(A) कादंबरी वाचनाची (B) झोपण्याची

(C) विश्रांतीची (D) चहाची

- End of Question Paper -